# आयुक्त,

## महिला व बाल विकास,महाराष्ट्र राज्य,

## २८, राणीचा बाग, पुणे

जाक्रमबाविआ/बाविं/का-५/प्रप्र/बाक्रस/ परिपत्रक/ २०१६-१७/महाराष्ट्र राज्य पुणे / 282 दिनांक : १.६.२०१६

परिपत्रक

**राज्यातील बाल न्याय अधिनियम २०१५ अंतर्गत दाखल होणाऱ्या आणि काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या संस्था प्रवेशाबाबत बाल कल्याण समितीने अवलंबवावयाच्या कार्य पध्दती बाबत ...........**

राज्यामध्ये बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ ची अंमलबजावणी करण्यात येते. या अधिनियमातील कलम २९ (१) नुसार काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या प्रकरणी त्यांच्या पुनर्वसन व सामाजिक पुनःस्थापनासाठी निर्णय घेण्याचे अधिकार अधिनियमातील कलम २७ (१) नुसार स्थापन करण्यात आलेल्या बाल कल्याण समितीस आहेत. त्यामुळे काळजी व संरक्षणाची गरज असलेले बालक समिती समोर सादर होवून त्याबालकास अधिनियमाच्या कलम ५० (१) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या बालगृहात दाखल करण्याचे अधिकारही बाल कल्याण समितीस आहेत. परंतु काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकास बालगृहात प्रवेश देण्याबाबत निर्णय घेताना अधिमियमातील काही तरतुदींचे पालन करणे आवश्यक असुनही बाल कल्याण समितीकडून अशाप्रकारचे पालन होताना दिसत नाही आणि त्यामुळे या अधिनियमाची परिणामकारक अंमलबजावणी होवू शकत नाही.

काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांबाबत निर्णय घेताना बाल कल्याण समिती कडून केवळ गरीबी, शिक्षणाची गरज असे निकष लावून बऱ्याच मुलांना बाल न्याय कार्यक्रमा अंतर्गत आणण्याचा प्रयत्न केला जातो आणि बालगृहांमध्ये दाखल केल्या जात आहे. केवळ गरीबी, शिक्षणाची गरज असे निकष लावून बालगृहात दाखल करण्यात आलेली बालके ज्या कालावधीत शाळांना सुट्टी असते अशा दिवाळी, उन्हाळी सुट्टीत आपआपल्या पालकांकडे परत जात असतात. या कालावधीकरीता त्यांचे पालक सक्षम असतात असे निदर्शनास येते. यामुळे अशा पालकांना अपात्र असलेले (unfit) किंवा असमर्थ पालक (incapacitated) ठरवून या बालकांना बालगृहात दाखल करण्यात येते. त्यामुळे काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकाबाबत संस्था प्रवेशाबाबतचा निर्णय घेताना अधिनियमाला अभिप्रेत असलेली बालगृहाची संकल्पना आणि बाल न्याय कार्यक्रमा अंतर्गत आलेल्या बालकाचे पुनर्वसन आणि सामाजिक पुनःस्थापन याची गरज याबाबींकडे पूर्णतः बाल

कल्याण समितीचे दूर्लक्ष होते. काही वेळेस बालकाला फार कमी कालावधीसाठी काळजी व संरक्षणाची गरज असते. परंतु या बाबींचा विचार बाल कल्याण समितीकडून करण्यात येत नाही. अशा पध्दतीने बालकांना बालगृहात दाखल करुन या बालकांचा कुटुंबात रहाण्याचा हक्क हिरावून घेतल्या जात असल्याचे निदर्शनास येते. काळजी व संरक्षणाची गरज असलेले बालक बालगृहात दाखल करण्यासाठीचे आदेश बाल कल्याण समितीकडून दिल्यानंतर त्या बालकाबाबतचा गृह चौकशी अहवाल आणि सामाजिक चौकशीचा अहवाल यांचा विचार करुन बालकांना संस्था प्रवेशाची गरज किती कालावधी साठी आहे ही बाब विचारात घेणे आवश्यक आहे. तसेच वेळोवेळी याबाबत आढावा घेवून बालकांच्या आवश्यकतेनुसार यापुर्वी दिलेल्या आदेशामध्ये सुधारणा करणे अपेक्षित आहे. परंतु अशा प्रकरची कार्यवाही होत नसल्याने बालक बराच काळ संस्थेत राहुन कौटुंबिक वातावरणापासून वंचित रहातो.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ मधील तरतुदींची अंमलबजावणी करताना अधिनियमाच्या कलम ३ मध्ये अंमलबजावणी करणाऱ्या सक्षम प्राधिकरणांनी खालील मार्गदर्शक तत्वांचा विचार करण्याबाबत तरतुद करण्यात आली आहे. त्यानुसार बालकांचा संस्था प्रवेशासाठी निर्णय घेताना प्रवेशाबाबत बाल कल्याण समितीने खालील महत्वाची मार्गदर्शक तत्वे विचारात घेणे आवश्यक आहे.

- कलम ३(३) नुसार सहभागीतेचे तत्व (*Principle of participation*)
- कलम ३(४) नुसार बालकाचे हिताचे तत्त्व (*Principle of best interest*)
- कलम ३(५) नुसार कुटुंबाच्या जबाबदारीचे तत्व(*Principle of family responsibility*)
- कलम ३(१२) नुसार संस्था प्रवेश हा पुनर्वसनाचा अंतिम पर्याय (*Principle of institutionalisation as a measure of last resort*)
- कलम ३ (१३) नुसार बालकाची मायदेशी रवानगी आणि कुटुंबात प्रस्थापनाचे तत्व (*Principle of repatriation and restoration*)

तथापी बालकाला संस्थेत दाखल करण्याचे आदेश देताना बाल कल्याण समितीकडून या तत्वांचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. समिती समोर येणाऱ्या काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या प्रत्येक बालकाला बालगृहात दाखल करणे हया एकमेव पर्यायाचा वापर बाल कल्याण समितीकडून केला जात आहे. पर्यायाने बाल कल्याण समिती केवळ येणाऱ्या बालकाला बालगृहात दाखल करणे किंवा प्रवेश नाकारणे एवढयाच कामाकरीता सिमित असल्याचे चित्र दिसून येते. बालकाच्या संस्था प्रवेशामध्ये अधिनियमातील तरतुदींचा विचार करता बाल कल्याण समितीकडून बालगृहामध्ये प्रवेश देताना उपयोगात येत असलेल्या पध्दतीमध्ये खालील प्रमाणे त्रूटी आढळुन आल्या आहेत.

**सध्याच्या प्रवेश पध्दतीतील त्रूटी**

- बालगृहात दाखल झालेल्या बालकांची संख्या पहाता बहुतांश बालकांचे प्रवेश हे मान्यता प्राप्त संस्थेकडूनच बाल कल्याण समितीला सादर झालेल्या अर्जावरच होतात.

- अधिनियमातील तरतुदीनुसार बालकाच्या बाबतीत कोणतीही चौकशी बाल कल्याण समितीकडून करण्यात येत नाही. काही वेळेस ज्या संस्थेकडून मुल सादर केले जाते त्या संस्थेच्या सामाजिक कार्यकर्ता किंवा कर्मचारी यांचेकडून गृह चौकशी अहवाल सादर करण्यात येतो (या कर्मचाऱ्यांकडे पुरेशी शैक्षणिक पात्रता किंवा अनुभव नसतो) आणि या अहवालावरच बालक संस्थेत दाखल देण्याचे आदेश दिले जातात.
- संस्थांकडून जुन -जुलै या कालावधीतच जास्ती जास्त बालके बाल कल्याण समिती समोर सादर होवून त्यांना दाखल आदेश दिले जातात. या व्यतिरिक्तच्या कालावधीत केवळ पोलिस आणि चाईल्ड लाईन यांचे मार्फतच मुले सादर होत असतात. यावरुन या बालकांना पुनर्वसन व सामाजिक पुनःस्थापनाची गरज नसून शिक्षणाची गरज असल्याचे दिसून येते. यामुळे बालगृहांचा केवळ वसतीगृह म्हणून उपयोग होताना दिसत आहे.
- संस्थेकडून १०० ते १५० बालके एका वेळेस (केवळ कागदपत्रे सादर करण्यात येतात प्रत्यक्षात बालक सादर होत नाही) बाल कल्याण समिती समोर सादर करण्यात येतात आणि बाल कल्याण समिती एकाच दिवसात या सर्व बालकांचा कोणताही सामाजिक तपास (Social Investigation) अहवाल किंवा चौकशी अहवाल न घेता या मुलांचे बालगृहात दाखल करण्याचे आदेश निर्गमीत करते.
- संस्थेकडून सादर होणाऱ्या गृह चौकशी अहवालामध्ये एकाच प्रकारचा अहवाल केवळ नाव व तत्सम बाबी बदलुन दिल्या जातो. या अहवालाबाबत कोणतीही शहनिशा बाल कल्याण समिती कडून केल्या जात नाही
- काही वेळेस बाल कल्याण समितीच्या एकाच सदस्याकडून संस्थेस भेट देवून कोणतीही चौकशी न करता केवळ संस्थेच्या अर्जावर दाखल करण्याचे अभिप्राय नोंदविण्यात येतात. परंतु सदस्याने अशा प्रकारच्या घेतलेल्या निर्णयाबाबत समितीच्या बैठकीत त्यास मान्यता घेण्यात येत नाही
- ज्या बालकांना संस्थेत दाखल करण्यात येत आहे अशा बालकांना अधिनियमाच्या कोणत्या कलमाखाली दाखल करण्यात आले आहे हे आदेशात नमूद नसते. काही वेळेस दाखल आदेशावर केवळ एका सदस्याची स्वाक्षरी असते. काही आदेशावर स्वाक्षरी तसेच दिनांक व जावक क्रमांक आढळून येत नाही
- बाल कल्याण समिती समोर बालक सादर झाल्यानंतर प्रथम त्या बालकांस कुटुंबात प्रस्थापीत होण्यासाठी बाल कल्याण समितीकडून प्रयत्न करणे आवश्यक असते. असे प्रयत्न करुनही बालकाचे कुटुंब मिळत नसेल तर या बालकाला संस्थाबाहय सेवा उपलब्धतेसाठी प्रयत्न करावा लागतो व अंतिम पर्याय म्हणून संस्थेत दाखल करावे असे कायद्याला अभिप्रेत आहे परंतु अशा प्रकारची कार्यवाही न होता बाल कल्याण समितीकडून बालकाला बालगृहात दाखल करण्याबाबत प्राथमिकता दिली जाते.
- बहुतकरुन बाल कल्याण समिती समोर दाखल होणारी बालके यांना शिक्षणासाठी तेथे आणलेले असते. परंतु या बालकांना अधिनियमाच्या कलम २ (१४) (v) नुसार मुलाची काळजी घेण्यासाठी अपात्र असलेल्या (unfit) किंवा असमर्थ पालकाचे बालक असे दाखवून काळजी व संरक्षणाच्या व्याख्येत बसवून बालगृहात दाखल करण्यात येते.
- बाल कल्याण समितीकडून बालगृहात दाखल करण्याचे आदेश निर्गमीत करताना त्या बालकास पुनर्वसन आणि समाजिक पुनःस्थापनाची गरज आहे किंवा नाही याची खात्री न करता संस्था प्रवेश देण्यात येतो.
- बालकाच्या संस्था प्रवेश प्रकरणी बाल कल्याण समितीमध्ये कोणत्याही प्रकारची चर्चा हावून निर्णय घेतला जात नाही.
- बालकाला संस्थेत दाखल करण्याबाबतची प्रवेश पध्दती याबाबत कोणतेही निकष बाल कल्याण समितीकडून, पाळले जात नाहीत. सदरहु बाब नियमबाहय आहे.

बालकांच्या संस्था प्रवेश पध्दती बाबत बाल कल्याण समिती कडून वरील प्रमाणे कार्यवाही होत असल्याने बाल न्याय कार्यक्रमात पुनर्वसन व सामाजिक पुनःस्थापनाची गरज नसलेली मुले दाखल होत आहेत आणि अशा बालकांना संस्था प्रवेश देवून बालकांचा कुटुंबात रहाण्याचा हक्क हिरावून घेण्यात येत आहे. तसेच बाल न्याय कार्यक्रमावर अनाश्यक ताण पडू

कार्यक्रमाचा दर्जा राखला जात नाही. यामुळे बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम २०१५ ची परिणामकारक अंमलबजावणी राज्यात होताना दिसत नाहीत. बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम २०१५ नुसार कायद्यामध्ये अभिप्रेत असलेली व्याख्या आणि प्रवेश कार्यपध्दती अभिप्रेत आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण ) अधिनियम २०१५ च्या कलम २ (१४) मध्ये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या मुलाबाबतची व्याख्या पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे.

१. ज्यांना घर किंवा निवारा नाही, निर्वाहाचे साधन नाही
२. कामगार कायदायाच्या उल्लंघनाने झालेले बाल कामगार, भिक मागत असलेले आणि रस्त्यावर रहाणारी
३. मुले अशा व्यक्ती बरोबर (जी मुलाचे पालक असो किंवा नसो ) रहातात आणि अशी व्यक्ती:
   i) मुलास हानी पोहचवित असले, मुलाचे शोषण करीत असले, मुलावर अत्याचार करीत असेल, मुलाकडे दूर्लक्ष करीत असेल किंवा त्यावेळेस बालकांच्या संरक्षणासाठी असणाऱ्या कायद्याचे उल्लंघन करीत असेल
   ii) जीवे मारण्याची धमकी देत असेल, हानी पोहचवीत असेल, किंवा मुलाचे शोषण करीत असेल किंवा असे करण्याची शक्यता असेल
   iii) व्यक्तीने एखाद्या बालकास किंवा बालकांना ठार मारले असेल, अत्याचार केला असेल, दुर्लक्षित केले असेल आणि अशाप्रकारची शक्यता मुलाच्या बाबतीत होणार असेल
४. मानसिकदृष्टया आजारी, मतिमंद, अपंग किंवा दुर्धर किंवा असाध्य आजाराने ग्रस्त आणि अशा मुलाची काळजी घेण्यासाठी कोणीही सहाय्य करण्यास नसेल किंवा पालक काळजी घेण्यास असमर्थ असतील असे सक्षम प्राधिकरणाच्या निदर्शनास आले असेल तर
५. पालक असलेल्या बालकांच्या बाबतीत बालकास काळजी व संरक्षणाची गरज असून पालक हे काळजी व संरक्षण करण्यासाठी असमर्थ असल्याचे समितीच्या निदर्शनास आल्यास
६. पालक नसलेले किंवा काळजी घेण्याकरीता कोणतीही व्यक्ती इच्छूक नसल्याने किंवा पालकांनी सोडून दिल्याने किंवा परित्याग केल्याने
७. हरविलेले किंवा पळून गेलेले किंवा किंवा प्रयत्न करुनही पालकांना न सापडलेले
८. अत्याचरीत, छळ झालेले, लैगिक किंवा बेकायदेशीर कृतीसाठी अत्याचारीत किंवा होण्याची शक्यता असलेले.
९. असुरंक्षित किंवा मानवी व्यापार अथवा मादक पदार्थांच्या दुरुपयोगासाठी समाविष्ठ होण्याची शक्यता असलेले आणि तिचे पालक, कुटुंबातील व्यक्ती, किंवा इतर कोणतीही व्यक्ती लग्नविधीला जबाबदार असतील
१०. गैरवाजवी फायद्याकरीता छळ करण्यात आलेले किंवा त्याची शक्यता असलेले
११. सशस्त्र संघर्ष, नैसर्गीक आपत्ती, नागरी अशांतता यांच्या प्रभावास बळी पडलेले
१२. लग्नाच्या वयात येणापूर्वी लग्नामुळे सुस्पष्ट धोका निर्माण झालेले आणि तिचे पालक, कुटुंबातील व्यक्ती, किंवा इतर कोणतीही व्यक्ती लग्नविधीला जबाबदार असतील

उपरोक्त प्रमाणे कायद्यात काळजी व संरक्षणाच्या मुलांची व्याख्या केली आहे. तसेच काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या मुलाबाबत अवलंबवयाची कार्यपध्दती याबाबत कायद्यामध्ये पुढीलप्रमाणे तरतुद करण्यात आली आहे.

- कलम ३१ (२) अन्वये राज्य शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार चौकशी कालवधीत बालकाला बालगृहामध्ये किंवा योग्य संस्थेमध्ये (Fit Institute), योग्य व्यक्ती (Fit person) यांचेकडे सोपविण्यात यावे.
- कलम ३२ (१) अन्वये ज्या संस्था, व्यक्ती, पोलिस ऑफीसर, नर्सिंग होम, रुग्णालय, प्रसुतीगृह यांनी मुलाचा ताब घेतलेला असेल अशांनी २४ तासाच्या आत प्रकरणानुसार चाईल्ड लाईन, जवळचे पोलिस स्टेशन, बाल कल्याण समिती किंवा जिल्हा बाल संरक्षण कक्षापैकी एकाकडे माहिती देणे किंवा एखाद्या मान्यता प्राप्त संस्थेत दाखल करणे बंधनकारक आहे

- कलम ३२ (२) अन्वये ३२ (१) नुसार ताब्यात घेतलेल्या मुलाची माहिती बालकाच्या प्रकरणानुसार संबधित यंत्रणांनी केंद्र शासनाच्या पोर्टलवर Uploaded करणे बंधनकारक आहे.
- कलम ३६ (१) अन्वये बाल कल्याण समिती समोर बालक सादर झाल्यानंतर समिती बालकाबाबत चौकशी करुन त्यानंतर बालकाला बालगृह/ योग्य संस्थेमध्ये (Fit Institute)/योग्य व्यक्ती (Fit person) यांचेकडे सुपूर्त करण्याबाबत आदेश देईल
- कलम ३६ (२) अन्वये बालकाबाबतचा सामाजिक तपास (Social Investigation) १५ दिवसात पूर्ण करुन बालक बाल कल्याण समितीसमोर दाखल झालेल्या दिनांकापासून ४ महिन्याच्या आत अंतिम आदेश देईल
- कलम ३६ (३) अन्वये बालकाबाबत प्राप्त झालेल्या चौकशी अहवालानुसार बालकाला कोणतेही कुटुंब किवा आधार नसल्याची समितीची खात्री झाल्यानंतरच या बालकाला बालगृहामध्ये किवा योग्य संस्थेमध्ये (Fit Institute), योग्य व्यक्ती (Fit person) यांचेकडे सोपविण्यात यावे.
- कलम ३६ (३) अन्वये बालकास बालगृहात दाखल केले नंतर समितीने सदर प्रकरणाचा नियमीतपणे आढावा घ्यावा असे नमूद आहे.
- अधिनियमाच्या प्रकरण ७ मध्ये बाल न्याय कार्यक्रमात दाखल होणाऱ्या बालकाच्या पुनर्वसन आणि पुनःस्थापनाबाबत तरतुद करण्यात आली आहे. या प्रकरणातील कलम ३९ (१) नुसार बालकाच्या पुनर्वसन आणि सामाजिक पुनःस्थापनाची कार्यपध्दती ही प्रत्येक काळजी आराखडा (Care Plan) यावर निर्धारीत असावी . असा आराखडा तयार करताना बालकाचे कुटुंब किवा पालक (Guardian) यांचेमध्ये पुनःस्थापन, दत्तक विधान, दत्तक संगोपन (Foster Care) अथवा प्रायोजकत्व (Sponsorship) यावर आधारीत असावा.
- अधिनियमाच्या कलम ४० (१) नुसार बाल न्याय कार्यक्रमात दाखल झालेल्या बालकाचे संरक्षण आणि पुनःस्थापन हे सर्वात महत्वाचे उद्दीष्ट आहे. त्यामुळे काळजी व संरक्षणाची गरज असलेले बालक बाल कल्याण समिती समोर आल्यानंतर बालकाबाबतचा सामाजिक तपास (Social Investigation) अहवाल विचारात घेवून त्यानुसार बालकास संरक्षण व पुनःस्थापनेची गरज असल्याबाबत खात्री करण्यात यावी व अंतिम पर्याय म्हणून बालगृहात दाखल करण्यात यावे.
- उपरोक्त बावी विचारात घेता काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना बालगृहामध्ये दाखल करताना अधिनियमातील तरतुदीचे काटेकोरपणे पालन होत नसल्याचे दिसून येते. त्या अनुषंगाने राज्यातील सर्व बाल कल्याण समिती यांना या परिपत्रकान्वये सुचित करण्यात येते की, कायद्यामध्ये नमूद केलेली मार्गदर्शक तत्वे आणि प्रवेशाबाबतच्या तरतुदी विचारात घेवून बाल न्याय कार्यक्रमा अंतर्गत दाखल होणाऱ्या काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या संस्था प्रवेशाबाबत खालील प्रमाणे कार्यपध्दती अवलंबविण्यात यावी.

१. समिती समोर बालक सादर केलेनंतर कलम ३६ (१) अन्वये बालकाबाबत चौकशी करण्याचे आदेश देण्यात यावेत
२. कलम ३६ (२) अन्वये बालकाबाबतचा सामाजिक तपास (Social Investigation) १५ दिवसात पूर्ण करण्यात यावा
३. बालकाबाबतची चौकशी आणि सामाजिक तपास (Social Investigation) अहवाल प्राप्त झाल्यानंतर बालकास कुटुंबात प्रस्थापीत होण्यासाठी बाल कल्याण समितीकडून प्रयत्न करण्यात यावा
४. प्रयत्न करुनही बालकाचे कुटुंब मिळत नसेल तर संस्थाबाहय सेवा ज्यामध्ये दत्तक विधान, दत्तक संगोपन (Foster Care) अथवा प्रायोजकत्व (Sponsorship) या पर्यायांचा प्राधान्याने विचार बालकाच्या पुनर्वसन आणि पुनःस्थापनासाठी करावा.

५. अधिनियमाच्या कलम ४० (१) नुसार बाल न्याय कार्यक्रमात दाखल झालेल्या बालकाचे संरक्षण आणि पुनःस्थापन हे सर्वात महत्वाचे उद्दीष्ट समोर ठेवूनच सदर बालकास संरक्षण व पुनःस्थापनेची गरज असल्याबाबत खात्री करण्यात यावी व अंतिम पर्याय म्हणून बालगृहात दाखल करण्यात यावे.

६. कलम ३(१२) नुसार संस्था प्रवेश हा पुनर्वसनाचा अंतिम पर्याय *(Principle of institutionalisation as a measure of last resort)* या तत्वाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

७. कलम ३६ (३) अन्वये बालकाबाबत प्राप्त झालेल्या चौकशी अहवालानुसार बालकाला कोणतेही कुटुंब किंवा आधार नसल्याची समितीची खात्री झाल्यानंतरच या बालकाला बालगृहामध्ये किंवा योग्य संस्थेमध्ये (Fit Institute), योग्य व्यक्ती (Fit person) यांचेकडे सोपविण्याबाबत आदेश व्हावेत.

८. संस्थेत दाखल आदेश निर्गमीत करताना त्यामध्ये कोणत्या कलमाखाली बालक दाखल करण्यात आले आहे याबाबतची स्पष्ट तरतुद असणे आवश्यक आहे. तसेच दाखल आदेश विहित नमून्यामध्ये निर्गमीत करण्यात यावे. आदेशावर किमान ३ सदस्यांच्या सहया असाव्यात.

९. एखाद्या सदस्याने बालकाच्या संस्था प्रवेशाबाबत निर्णय घेतला असल्यास समितीच्या पुढील बैठकीस सदर निर्णयाबाबत चर्चा करुन बैठकीत घेण्यात यावी आणि त्यानुसार दाखल आदेश विहित नमून्यामध्ये निर्गमीत करण्यात यावे.

१०. बाल कल्याण समितीने बैठकीत झालेली चर्चा आणि निर्णय या बाबतची लिखित स्वरुपातील प्रकरणनिहाय माहिती रोजनाम्याच्या स्वरुपात ठेवावी.

११. कलम ३९ मध्ये दाखल होणाऱ्या बालकाचे पुनर्वसन आणि पुनःस्थापनासाठी प्रत्येक बालकाचा स्वतंत्र असा काळजी आराखडा (Care Plan) तयार करणे संस्थास्तरावर बंधनकारक आहे. असा आराखडा तयार करताना बालकाचे कुटुंब किंवा पालक (Guardian) यांचेमध्ये पुनस्थापन, दत्तक विधान, दत्तक संगोपन (Foster Care) अथवा प्रायोजकत्व (Sponsorship) यावर आधारीत असावा. असा आराखडा प्रत्येक संस्थेने तयार केला असल्याबाबतची खात्री बाल कल्याण समितीने करावी आणि सदर आराखडयानुसार बालकाच्या प्रगतीबाबतची माहिती संस्था भेटीत तपासण्यात यावी.

१२. अधिनियमाच्या कलम २ (१४) (v) नुसार मुलाची काळजी घेण्यासाठी लायक नसलेले (unfit) किंवा असमर्थ पालकाचे (incapacitated) बालक निश्चित करताना सदर बालक हे समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असल्याबाबत खात्री करुन त्याला कलम ३९ नुसार पुनर्वसन आणि सामाजिक पुनःस्थापनेची गरज आहे याबाबत खात्री करण्यात यावी. केवळ पालकांची आर्थिक परिस्थिती हालाकीची आहे किंवा गावात शैक्षणिक सुविधा उपलब्ध नाहीत या कारणासाठी बालगृहात प्रवेश देण्यात येवू नये. त्याऐवजी अशा पालकांना शासनाच्या विविध विभागामार्फत कार्यरत वसतीगृहांची /योजनांची माहिती देण्यात यावी.

१३. अधिनियमाच्या कलम २ (१४) (४) नुसार मुलाची काळजी घेण्यासाठी लायक नसलेले (unfit) किंवा असमर्थ पालक (incapacitated) याची व्याख्या करताना केवळ गरीबी हा निकष लावू नये असमर्थ पालक यामध्ये खालील निकषांना प्राधान्य देण्यात यावे

- दुर्धर व असाध्य रोगाने पिडित असलेले पालक
- पालकांकडून बालकांचे हक्क डावलण्यात येत असून बालकांना भिक मागावयास लावणारे पालक
- अनैतिक व्यवसायात गुंतलेल्या महिला

- मुलाचा मानवी व्यापार करणारे पालक
- बालकावर लैंगिक, शारिरिक, पाशवी, मानसिक अत्याचार करणारे पालक

१४. स्थलांतरीत कष्टकरी, ऊसतोड, बांधकामे, दगडांच्या खाणी, रस्ते बांधणी, शेती, कापूस वेचणी या निरनिराळया क्षेत्रात विविध जिल्हयातुन, राज्यातुन मोठया प्रमाणावर कुटुंबे स्थलातरीत होतात. यामुळे या कुटुंबातील बालकांना काळजी व संरक्षणाची गरज आहे अशी धारणा होवून या बालकांना बाल न्याय कार्यक्रमा अंतर्गत बालगृहामध्ये दाखल करण्यात येते. परंतु प्रत्यक्षात या बालकांना कुटुंब असून ही बालके समाजाच्या प्रवाहातच असल्याने त्यांना पुनर्वसन व पुनःस्थापनेची गरज नसते. अशा परिस्थितीत त्यांची खरी गरज असते त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची. परंतु या करीता बालगृहात दाखल करणे हा पर्याय नाही. याकरीता शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने त्यांच्या परिपत्रक क्र मप्रशिप/सशिअ/नि वसतीगृह/२०१५-१६ २६४३ दिनांक १.१०.२०१५ अन्वये स्थलांतरीत कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी आणि ही बालके शिक्षणाच्या प्रवाहात यावी व त्यांचे स्थलांतरण रोखण्यासाठी हंगामी वसतीगृह वसतीगृहाच्या संकल्पनेची व्याप्ती वाढवून या योजने अंतर्गत अशा बालकांसाठी अन्न तसेच इतर सुविधा कुटुंबातच पुरविण्याबाबत तरतुद करण्यात आली आहे. त्यामुळे अशा बालकांना या योजनेचा लाभ दिल्यास ती कुटुंबात रहातील केवळ शिक्षणासाठी बालगृहात दाखल करावे लागणार नाही. याकरीता स्थलांतरीत कष्टकरी, ऊसतोड, बांधकामे, दगडांच्या खाणी, रस्ते बांधणी, शेती, कापूस वेचणी या निरनिराळया क्षेत्रातील स्थलांतरीत कुटुंबातील बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी बाल कल्याण समितीने अशा बालकांना बालगृहात प्रवेश न देता शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १.१०.२०१५ परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या योजनेचा लाभ घेण्यासाठी पालकांना उद्युक्त करावे जेणे करुन बालक कौटुंबिक वातावरणापासून वंचित रहाणार नाही.

१५. ज्या संस्थेने बालक समिती समोर सादर केले आहे त्या संस्थेला बालकाबाबतची चौकशी किवा सामाजिक तपास अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात येवू नये त्याऐवजी सदर चौकशी किंवा सामाजिक तपास अहवाल सादर करण्याचे आदेश जिल्हयातील शासकीय संस्थामधील परिविक्षा अधिकारी किवा जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांना देण्यात यावेत.

वरील सुचनांचे काटेकारपणे पालन सर्व बाल कल्याण समितीने करावे. तसेच सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना यापरिपत्रकान्वये सुचित करण्यात येते की, त्यांनी बालगृहांची तपासणी करताना बालगृहामध्ये दाखल झालेल्या बालकाच्या प्रवेशाबाबत बाल कल्याण समितीने उपरोक्त दिलेल्या सुचनांचे पालन केले आहे किवा नाही याबाबत खात्री करावी.

स्थळ प्रतीवर मा.आयुक्त यांची स्वाक्षरी असे.

आयुक्त ९।६।१६
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य, पुणे १.यांचेकरिता

प्रत :-
१.मा.प्रधान सचिव, महिला व बाल विकास मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर

प्रती :-
१. विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास, पुणे, कोकण, नाशिक, औरंगाबाद , अमरावती, नागपूर विभाग
२. अध्यक्ष / सदस्य बाल कल्याण समिती (सर्व)
३. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (सर्व)